# **मित्रमेळा,** राजापूर
## आणि
## **आसमंत फाऊंडेशन,** रत्नागिरी आयोजित
## *संस्कारवर्ग अभिप्राय*

सन २०१४

सर्वप्रथम 'मित्रमेळा,' राजापूर आणि आसमंत फाऊंडेशन, रत्नागिरी यांचे मनःपूर्वक आभार आणि दिवाळी सणाला बाल संस्कारांची मेजवानी यशस्वी केल्याबद्दल हार्दिक अभिनंदन!

आपल्या संस्कारवर्ग शिबीरामध्ये अतिशय माफक वेळेमध्ये कागदी पिशवी - पणती स्टॅण्ड - भेटकार्ड - कागदी फूल निर्मिती, वारली चित्रकला, सुलेखन अशा उपक्रमांच्या माध्यमातून बालकांच्या हस्तकलेला आणि सृजनत्वाला आपण घातलेली साद कौतुकास्पद आहे. स्तोत्र, प्रार्थना यांच्या दैनिक पठणातून बालमनावर आपण संस्कार बिजे फुलवलीत. नकाशावाचन, पत्रलेखन बौद्धिक/मनोरंजनात्मक खेळ घेऊन बालकांच्या आदर्श व्यक्तीमत्वासाठी सर्वस्पर्शी प्रयत्न मनाला आनंद देऊन गेले. बालकांच्या सुट्टीमध्ये आपण दिलेली हि मेजवानी लाडू/करंज्यापेक्षा गोड आणि चकल्यांपेक्षा कुरकुरीत, फटाक्यांपेक्षा जास्त आनंददायी ठरली.

आपण हि प्रज्वलीत केलेली 'संस्कार पणती' सर्वस्पर्शी मंगलमय, हर्षवर्धक, असून संस्कार प्रकाश समर्पित करणारी होती.

नाव : सौ. प्रिया संदिप देशपांडे
मोबा. नं. ९४२०९१०९०१

- आपल्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

**मित्रमेळा,** राजापूर

आणि

**आसमंत फाऊंडेशन,** रत्नागिरी आयोजित

# *संस्कारवर्ग अभिप्राय*

सन २०१४

सध्याच्या गतिशील विज्ञान युगात संस्कारक्षम पीढी घडणे ही भारतापुढील आणि एकूणच जगापुढील मोठी समस्या निर्माण झाली आहे. या भारताच्या 'भवितव्यांना' लहानपणीच जर संस्काराचे बाळकडू पाजले तर नक्कीच ही संस्कारक्षम मुले समाजाच्या उपयोगी पडतील हे हेरूनच मित्रमेळा, राजापूर आणि आसमंत फाऊंडेशन, रत्नागिरी यांनी राजापूर येथे १० दिवसांचा संस्कारवर्ग आयोजित केला त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच.

या संस्कारवर्गात श्लोक, प्रार्थना, खेळ, विविध विषयांवरील तज्ज्ञांची व्याख्याने, चित्रकला, हस्तकला, कार्यानुभव वस्तू इ. विविध विषयांच्या माध्यमातून मुलांना अष्टपैलू व्यक्तिमत्व घडण्यास मदत झाली. या दोन्ही संस्थांच्या भावी वाटचालीसाठी व वटवृक्षाप्रमाणे पसरण्यासाठी आमच्या शुभेच्छा.

नाव : श्री. सुहास यशवंत काडगे.

मोबा. नं. ८०८९७७६४३५२.

# मित्रमेळा, राजापूर

आणि

# आसमंत फाऊंडेशन, रत्नागिरी आयोजित

## संस्कारवर्ग अभिप्राय

सन २०१४

महोदय,

मित्रमेळा आणि आसमंत फाऊंडेशन रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी जो मुलांसाठी सुट्टीमधील संस्कारवर्ग चालवला गेला. त्यामधून मुलांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम व कृती यांचा समावेश करण्यात आला होता. या सर्व उपक्रमांचा मुलांच्या मनावर चांगला परिणाम दिसून आला. तसेच मुलांच्या कलागुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने अशा प्रकारे उत्तम असे नियोजन करण्यात आले होते. या सर्व गोष्टींसाठी ज्या सर्व ज्ञात व अज्ञात अशा कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले त्यांचे ^ शतशः आभार!

आपल्या मार्फत वेळोवेळी अशा प्रकारे मार्गदर्शन व प्रोत्साहन मुलांना मिळावे व मुलांचे भाव विश्व फुलवण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न व्हावेत ही सदिच्छा!

नाव सौ. अरुंधती अविनाश दुगरे

मोबा. नं. ९४०३४६२८२३